# पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि., सेनापती बापट रोड, आयसीसी टॉवर, पुणे येथे खालील तक्त्यात नमूद केलेल्या जागा अकरा महिने मुदतीसाठी करार पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात एकवट मानधनावर भरण्यासाठी निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करावयाची आहे. त्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेली शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून थेट मुलाखतीसाठी (Walk- in Interview) अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन र. रु. | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | माहिती तंत्रज्ञान व प्रोग्रॅम व्यवस्थापक वर्ग- १ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (बी.ई. कॉम्प्युटर्स) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) डाटा सेंटर ॲडमिनिस्ट्रेशन नेटवर्किंग (लॅन, वॅन) हार्डवेअरमधील किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) एमबीए असल्यास प्राधान्य.<br>ड) **वयोमर्यादा :** वय वर्ष ३५ पेक्षा जास्त | र. रु. ७५,०००/- | दि. १३-१०-२०१७ सकाळी ११.०० वाजता. |
| २ | उपअभियंता (माहिती व तंत्रज्ञान) वर्ग- २ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (बी.ई. कॉम्प्युटर्स) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) **अनुभव :** माहिती व तंत्रज्ञान कामाचा किमान १० वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) **वयोमर्यादा :** वय वर्ष ३५ पेक्षा जास्त | र. रु. ५५,०००/- | दि. १३-१०-२०१७ सकाळी ११.०० वाजता. |
| ३. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग- ३ | २ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी/ पदविका उत्तीर्ण अगर तत्सम पदवी/ पदविका<br>ब) **अनुभव :** अभियांत्रिकी कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) **वयोमर्यादा :** वय वर्ष २५ पेक्षा जास्त | र. रु. ४०,०००/- | दि. १३-१०-२०१७ सकाळी ०९.०० वाजता. |
| ४ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) वर्ग- ३ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी/ पदविका उत्तीर्ण अगर तत्सम पदवी/ पदविका.<br>ब) **अनुभव :** अभियांत्रिकी कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) **वयोमर्यादा :** वय वर्ष २५ पेक्षा जास्त | र. रु. ४०,०००/- | दि. १३-१०-२०१७ सकाळी ०९.०० वाजता. |
| ५ | कनिष्ठ अभियंता (माहिती व तंत्रज्ञान) वर्ग- ३ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (बी.ई. कॉम्प्युटर्स) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) (हार्डवेअर/ नेटवर्किंग) संगणक देखभाल व दुरुस्तीचा ३ वर्षांचा अनुभव किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक हार्डवेअरमधील पदविका आणि ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) (सॉफ्टवेअर) प्रोग्रॅमिंग/ सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमधील किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ड) **वयोमर्यादा :** वय वर्ष २५ पेक्षा जास्त. | र. रु. ४५,०००/- | दि. १३-१०-२०१७ सकाळी ०९.०० वाजता. |
| | | | **माहिती व जनसंपर्क विभाग** | | |
| ६ | जनसंपर्क अधिकारी (पी.आर.ओ.) - २ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) Journalisam & Mass Communication मधील डिप्लोमा/ डिग्री आवश्यक.<br>क) शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील अथवा इतर संस्थेकडील सहा. माहिती व जनसंपर्क अधिकारी या पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव, प्रसार माध्यम क्षेत्रातील व प्रोटोकॉलविषयक कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ड) **वयोमर्यादा :** वय वर्ष ३५ पेक्षा जास्त | र. रु. ५०,०००/- | दि. १३-१०-२०१७ दुपारी ०१.०० वाजता. |
| ७ | कन्टेन्ट रायटर-कम-ट्रान्सलेटर वर्ग- ३ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील Journalisam & Mass Communication मधील डिप्लोमा उत्तीर्ण आवश्यक.<br>ब) मराठीतून इंग्रजीमध्ये व इंग्रजीतून मराठीमध्ये भाषांतरकारास प्राधान्य.<br>क) रायटिंग, एडिटिंग, प्रूफरीडिंग आणि पब्लिशिंगमधील ५ वर्षांचा अनुभव आवश्यक तसेच प्रोटोकॉलविषयक कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ड) **वयोमर्यादा :** वय वर्ष ३० पेक्षा जास्त. | र. रु. ४५,०००/- | दि. १३-१०-२०१७ दुपारी ०१.०० वाजता. |
| | | | **प्रशासकीय विभाग** | | |
| ८ | प्रशासकीय अधिकारी/ अधीक्षक वर्ग-२ | १ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) **अनुभव :** शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडील प्रशासन अधिकारी या पदावरील एक वर्षाचा किंवा शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडील दहा वर्षांचा प्रशासकीय कामकाजाचा अनुभव.<br>क) **वयोमर्यादा :** वय वर्ष ३५ पेक्षा जास्त. | र. रु. ४५,०००/- | दि. १३-१०-२०१७ दुपारी ०१.०० वाजता. |
| | | | **विधी विभाग** | | |
| ९ | कायदेशीर आणि सचिवालय व्यवस्थापक वर्ग- १ | १ (अर्ध वेळ) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील/ न्यायालयीन कामाशी संबंधित पदावरील किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा सत्र न्यायालयातील १० वर्षे वकिलीचा अनुभव तसेच कॉर्पोरेट व कॉन्ट्रक्ट लॉ क्षेत्रातील असल्यास प्राधान्य.<br>क) **वयोमर्यादा :** वय वर्ष ३५ पेक्षा जास्त | र. रु. ४०,०००/- | दि. १३-१०-२०१७ दुपारी ०१.०० वाजता. |

**मुलाखतीचे ठिकाण : भारतरत्न पं. भीमसेन जोशी कलामंदिर, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध महापालिका सहा. आयुक्त कार्यालय, पुणे ४११००७.**

**सर्वसाधारण अटी :**

१. वयोमर्यादा : जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास गणले जाईल.
२. अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
३. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द बातल होईल, तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
४. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेचे दाखले, गुणपत्रिका व अनुभवाच्या दाखल्यांच्या प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडणे आवश्यक आहे.
५. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण वा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक/ व्यावसायिक अर्हता तसेच फोटो नसलेले, अर्जावर स्वाक्षरी नसलेले, खाडाखोड केलेले, विसंगत माहिती असलेले अर्ज अपात्र समजले जातील. अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
६. निवड झालेल्या उमेदवारास नियमित सेवकांचे कोणतेही फायदे लागू होणार नाहीत.
७. निवड झालेल्या उमेदवारांनी रुपये १०, ०००/- सेवा अनामत म्हणून जमा करणे आवश्यक आहे, सदर अनामत रक्कम जमा केल्याशिवाय उमेदवारास रुजू करून घेतले जाणार नाही.
८. जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या आणि निवडीची पद्धत यामध्ये काही कारणाने कोणताही बदल करण्याचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांच्याकडे राहतील.
९. शासकीय निमशासकीय निवृत्त कर्मचाऱ्यांना उपरोक्त नमूद पदासाठी अर्ज करता येईल.
१०. नियुक्त होणाऱ्या उमेदवारास, सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र भरून द्यावे लागेल.
११. तांत्रिक पदासाठी आरक्षणानुसार मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे खुल्या गटातून भरण्यात येतील.

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** ७-१०-२०१७

**(डॉ. राजेंद्र जगताप)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.

www.fisco.in